# विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक

राज्यपालांचे अभिभाषण सायंकाळी ४.०० वाजता सुरु होणार आहे, ते संपल्यानंतर ३० मिनिटांची विश्रांती राहील. त्यानंतर विधानपरिषदेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम खालीलप्रमाणे राहील.

## महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४.

**शुभारंभ** : **वंदे मातरम्.**

**एक** : **राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन** : **राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.**

**तीन** : **नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**चार** : **मंत्र्यांचा परिचय.**

**पाच** : **शोक प्रस्ताव -**

" श्री. मोहम्मद फजल माजी राज्यपाल, सर्वश्री व्यंकाप्पा नारायण पतकी व जनार्दन यशवंतराव टेकावडे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव."

**सहा** : **अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **अ)** "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्तांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**ब)** "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदाचे) आरक्षण अध्यादेश, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**क)** "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १५ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महसूल मंत्री** : "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १६ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**सात** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**आठ** : सभापती, श्री. विनायक तुकाराम मेटे, वि.प.स.यांना सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर,२०१४ रोजी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९१(२) व दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २(१)(क) अन्वये अनर्ह घोषित करण्यात आल्याची घोषणा करतील.

**नऊ** : सभापती, विधानसभेवर निवडून गेलेल्या विधानपरिषद सदस्यांबाबत घोषणा करतील.

## राष्ट्रगीत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१४.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.